## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /१८२९/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सुरेश बाबुराव होले | कार्यालय अधिक्षक<br>पोलीस प्राधिकरण कार्यालय,<br>खडकवासला, पुणे | सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)<br>पोलीस आुयक्त कार्यालय, पुणे |

**(सुनावणी दिनांक- १७.०४.२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. ०८.०५.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, निर्णय दिला नाही असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०६.०१.२०२५ | दि. २७.०६.२०२४ व २५.०७.२०२४ असे अर्ज आपल्या कार्यालयाकडे चौकशीसाठी दिलेबाबत १ ते ८ मुद्यांची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, "तक्रार अर्ज दिला होता. माहिती दिली नाही" त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, "संबंधित पोलीस स्टेशनकडून अहवाल मागणी केला आहे अहवाल अप्राप्त आहे."

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाला उत्तर/ माहिती दिल्याचे दिसुन येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकामी विद्यमान जन माहिती अधिकारी म्हणून कंत्राटी लिपिक हे सुनावणीकामी उपस्थित असल्याचे रोजनाम्यावरुन दिसून येते ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार शासकीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी नेमणे याबाबत शासन स्तरावरुन स्पष्ट सूचना असतानाही आपलेस्तरावर कंत्राटी कर्मचा-याची नेमणूक करणे हे माहिती देण्याच्या प्रक्रियेत जाणीवपूर्वक अडथळा निर्माण करण्यासारखे आहे याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते अधिनियमातील कलम २०(१) नुसार दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत केला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(१) चा भंग केलेला असल्याने ते अधिनियमातील कलम २०(२) नुसार शिस्तभंग विषयक कार्यवाहीस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय पुणे यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त करून घेऊन कलम ७(६) नुसार व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, पोलिस प्राधिकरण कार्यालय खडकवासला पुणे यांनी माहिती अर्जावर विहित मुदतीत काहीही कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार दंडात्मक कारवाई का करण्यात येवू नये ? याबाबतचा लेखी खुलासा अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे पोहोचसह दि.२२/०६/२०२६ रोजी आयोगास समक्ष उपस्थित राहून सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय पुणे यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत केला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(१) चा भंग केलेला असल्याने त्यांचेविरुद्ध अधिनियमाच्या कलम २० (२) प्रमाणे शिस्तभंग विषयक कार्यवाहीची शिफारस का करण्यात येऊ नये या बाबतचा लेखी खुलासा अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे पोहोचसह दि.२२/०६/२०२६ रोजी आयोगास समक्ष उपस्थित राहून सादर करावा.

४. वर्तमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ / १८२९/२०२५/पुणे 2838 दिनांक - 8/6/2026.

रामाआ-पुणे/२०२५/NSB